महावितरण

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.

Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११

C.I.N. No. U४०१०९MH२००५SGC१५३६४५

जा. क्र. औसंवि/ब/६१६७ दिनांक : १५.०३.२०२१

# परिपत्रक

**विषय :** MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy दि.१५.०२.२०२१ ते १४.०५.२०२१ या कालावधीकरीता सुरु ठेवण्याबाबत.

**संदर्भ :** सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क. औसंवि/ब/७८४१ दि.०९.०३.२०२०

******

म.रा.वि.मं.सुत्रधारी कंपनी मर्यादित व महावितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांना रु.५ लाखांची MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy दि.१५.०२.२०२० ते १४.०२.२०२१ या कालावधीकरीता सुरु करण्यात येऊन, त्याबाबत संदर्भिय परिपत्रक प्रसारित करण्यात आलेले आहे.

MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy सन २०२०-२१ ची मुदत दि.१४.०२.२०२१ रोजी मध्यरात्री संपुष्टात आल्यामुळे, सदर योजनेच्या शर्ती व अटी कायम ठेऊन **पुढील ०३ महिन्यांकरीता म्हणजेच दि.१५.०२.२०२१ ते १४.०५.२०२१** या कालावधीसाठी पुढे सुरु ठेवण्याकरीता मा.व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्यादित यांनी मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, महापारेषण व महानिर्मिती तसेच चारही कंपन्यांचे संचालक (वित्त) तसेच संचालक (मासं), महावितरण व कार्यकारी संचालक (मासं), महानिर्मिती / महापारेषण यांच्यांशी विचारविनिमय करुन मंजूरी दिली आहे.

***सदर आरोग्य विमा योजना दि. १५.०२.२०२१ ते दि. १४.०५.२०२१ या कालावधीकरीता खालील प्रमाणे आहे.***

१. MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy (Extension for 3 months) या योजनेचा कालावधी दि.१४.०२.२०२१ च्या मध्यरात्रीपासून म्हणजेच दि.१५.०२.२०२१ (००:०० तासापासून) ते दि.१४.०५.२०२१ च्या मध्यरात्रीपर्यंत (२४:०० तासांपर्यंत) असा तीन महिन्यांचा राहील.

२. आरोग्य विमा योजना तीन महिन्यांकरिता म.रा.वि.मं.सुत्रधारी कं.मर्या. व महावितरण या कंपन्यांमधील सर्व कर्मचाऱ्यांच्या (सर्व सहाय्यक कर्मचारी देखील) वेतनातून माहे मार्च -२०२१ पासून ते माहे मे -२०२१ पर्यंत **दरमहा रु.७००/-(GST सह)** इतकी विमा हप्ता रक्कम कपात करण्यात येईल. सदर कालावधीत नव्याने रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातून देखील सदर विमा हप्ता रक्कम कपात करण्यात यावी व सदर कर्मचाऱ्यांना मेडिक्लेम योजनेचा लाभ उपलब्ध करुन देण्यात यावा.

**टिप :** १. जे कर्मचारी माहे फेब्रुवारी - २०२१ मध्ये सेवानिवृत्त झाले आहेत अशा कर्मचाऱ्यांना व त्यांच्या अवलंबितांना (वारसांना) या आरोग्य विमा योजनेचा लाभ दि.१४.५.२०२१ पर्यंत मिळणार असल्याने अशा कर्मचाऱ्यांच्या अंतिम देयकातून वर नमूद केल्याप्रमाणे विमा हप्ता रक्कम एकरक्कमी रु.२१००/- (GST सह) तीन महिन्यांच्या योजनेकरिता कपात करण्यात यावी.

२. जे कर्मचारी माहे मार्च - २०२१ ते मे - २०२१ या कालावधीत सेवानिवृत्त अथवा मयत झाल्यास अशा कर्मचाऱ्यांच्या वेतनातून वार्षिक विमा हप्ता रक्कमेपैकी दरमहा कपात करण्यात आलेली विमा हप्ता रक्कमे व्यतिरीक्त उर्वरित कालावधीची रक्कम कर्मचाऱ्यांच्या अंतिम देयकातून कपात करण्यात यावी.

३. वर नमूद केल्यानुसार मेडीक्लेम योजनेसाठी कर्मचाऱ्यांकडून वैयक्तिकपणे अदा करण्यात येणारी विमा हप्ता रक्कम आयकर कायद्याच्या कलम -८० (ड) नुसार सवलतीसाठी पात्र राहील.

४. सदर योजना माहे जाने २०२१ पर्यंत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना लागू राहणार नाही. अशा कर्मचाऱ्यांनी दि ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनी मर्यादित यांचे पत्र दि. २१.०१.२०२१ नुसार "हॅप्पी फॅमिली फ्लोटर पॉलिसी" या योजने अंतर्गत सलगतेचा लाभ वैयक्तिकपणे घ्यावा.

५. वर नमूद केल्यानुसार कपात करण्यात आलेली विमा हप्त्याची रक्कम सर्व कार्यालयांनी **ERP-10902351** या खाते शिर्षकाखाली (Account Head) जमा करण्याबाबतची कार्यवाही करावी.

६. महावितरण कंपनीतील सर्व सहाय्यक प्रवर्गाच्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर रु.७००/- इतकी रक्कम आरोग्य विमा अनुदान म्हणून माहे मार्च - २०२१ ते मे - २०२१ या कालावधीकरिता वेतनातून अदा करण्यात यावी.

७. म.रा.वि.मं. सुत्रधारी कं.मर्या व महावितरण कंपन्यांतील कर्मचाऱ्यांची सदर योजनेच्या कालावधीमध्ये सेवा समाप्ती (Termination) झाल्यास किंवा कर्मचाऱ्याचा राजीनामा स्विकारल्यास अशा कर्मचाऱ्यास व त्याच्या अवलंबितास या योजनेचा लाभ उर्वरित कालावधीसाठी मिळणार नसल्याने याबाबतची कार्यवाही करण्यासंदर्भातील दक्षता संबंधीत विभागाने घ्यावी.

८. Additional Top Up च्या विमा हप्त्याच्या रक्कमेबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क.औसंवि/ब/७८४१,दि.०९.०३.२०२० मधील अटी व शर्ती कायम राहतील.

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या **Employee Portal** अंतर्गत **Mediclaim** व **Circular - Industrial Relation Department** येथे उपलब्ध असून त्याची मुद्रांकित प्रत प्रसारीत करण्यात येणार नाही.

(संजय रा. ढोके)
**मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी**

प्रति,
सर्व कार्यकारी अभियंता व तत्सम व त्यावरील दर्जाचे अधिकारी, महावितरण.

प्रत माहितीसाठी सविनय सादर :

१. व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.मं. सुत्रधारी कं.मर्या., मुंबई.
२. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई.
३. संचालक (वित्त) / (सुरक्षा व अंमलबजावणी), म.रा.वि.मं.सुत्रधारी कं.मर्या., सां.का., मुंबई.
४. संचालक (वित्त) / (संचलन) / (प्रकल्प) / (वाणिज्य) / (मासं) महावितरण, सां.का., मुंबई.
५. सर्व कार्यकारी संचालक, महावितरण, सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई.